17 JUL 2026
पुढारी

# राजकारणातील नैतिकता हेच डॉ. एन. डी. पाटील यांच्या कार्याचे अधिष्ठान

## किशोर बेडकीहाळ ; डॉ. एन डी पाटील जयंतीनिमित्त व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. एन.डी. पाटील म्हणजे राजकारणातील नैतिकता, सामाजिक न्याय आणि मूल्यनिष्ठ नेतृत्वाचे प्रतीक होते. त्यांच्या प्रत्येक चळवळीमागे उच्च नैतिकतेचे अधिष्ठान होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात डॉ. एन.डी. पाटील जयंतीनिमित्त 'डॉ. एन.डी. पाटील आणि सामाजिक चळवळी' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, तर डॉ. सरोज पाटील प्रमुख उपस्थित होत्या.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'डॉ. एन.डी. पाटील आणि सामाजिक चळवळी' या विषयावर बोलताना किशोर बेडकिहाळ.**

बेडकीहाळ यांनी शेतकरी, शेतमजूर, कामगार, धरणग्रस्त आणि वंचितांच्या प्रश्नांसाठी डॉ. पाटील यांनी आयुष्यभर संघर्ष केल्याचे सांगितले. त्यांच्या प्रत्येक आंदोलनामागे सखोल अभ्यास, नैतिकता, योग्य वेळ आणि शांततामय संघर्ष हे चार आधारस्तंभ असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. विलास शिंदे यांनी विद्यार्थ्यांनी कोणत्याही विषयाचा सर्वांगीण अभ्यास करूनच भूमिका घ्यावी, हा डॉ. पाटील यांच्या जीवनातील महत्त्वाचा संदेश असल्याचे सांगितले. डॉ. सरोज पाटील यांनी सहजीवनातील आठवणींना उजाळा देत, डॉ. पाटील हे समाजाच्या वेदनांवर फुंकर घालणारे संवेदनशील व्यक्तिमत्त्व होते, असे भावनिक उद्गार काढले.

17 JUL 2026
लोकमत

# एन.डीं.च्या प्रत्येक चळवळीला नैतिकतेचे अधिष्ठान : बेडकीहाळ

## शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** डॉ.एन. डी. पाटील म्हणजे राजकारणातील नैतिकता, सामाजिक न्यायाचा ध्यास होते. त्यांच्या प्रत्येक चळवळीला, आंदोलनाला त्यांच्या उच्च नैतिकतेचे अधिष्ठान लाभलेले होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी बुधवारी केले.

ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात 'डॉ. एन. डी. पाटील आणि सामाजिक चळवळी' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाच्या डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. डॉ. सरोज पाटील प्रमुख उपस्थित होत्या. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी, सरोज पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, प्रांजली क्षीरसागर, डॉ. सुखदेव एकल, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. टी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रभंजन माने, डॉ. कृष्णा पाटील उपस्थित होते.



विद्यापीठात आयोजित व्याख्यानात किशोर बेडकीहाळ यांनी मार्गदर्शन केले.

17 JUL 2026

तरूण भारत

# ‘राष्ट्रीय युवा संसद’ मध्ये विद्यापीठ विजेते

**प्रतिनिधी ,कोल्हापूर**

भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित १७ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सलग तिसऱ्यांदा गटस्तर विजेतेपद पटकावले आहे. दिल्लीतील संसद भवन परीसरातील बालयोगी सभागृहात केंद्रीय संसदीय कार्य व कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या संघाला विजेतेपदाचा चषक प्रदान करण्यात आला.

याबरोबरच शिवाजी विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांना “गुणवत्तापूर्ण बेस्ट प्रेझेंटर“ पुरस्कार प्रदान करण्यात आला. यामध्ये स्वप्निल माने, संदेश लडकट, नेहा शिंदे, तेजस सन्मुख, श्रेया म्हापसेकर, चंदनकुमार ओझा, श्रुती कुरणे, प्रतिभा बामणे यांचा समावेश आहे. शिवाजी विद्यापीठ युवा संसद स्पर्धा समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनाही सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. युवा संसद संघासोबत डॉ. संतोष सुतार उपस्थित होते.

या युवा संसदेमध्ये शपथ ग्रहण करणे, श्रद्धांजली व्यक्त करणे, नवीन मंत्र्यांचे परिचय करणे, प्रश्न कालावधी, विशेषाधिकार भंग प्रस्ताव, आवश्यक अहवाल किंवा दस्तऐवज सभेत मांडणे, राज्य सभेकडून संदेश लोकसभेमध्ये सादर करणे, विदेशी प्रतिनिधींचे संसदेमध्ये औपचारिक स्वागत करणे, अतीमहत्वाच्या विषयाकडे संसदेचे लक्ष वेधूने, बिल पास, नवीन कायदे, विधेयक प्रस्तावांचा विचार करणे, सभागृह विसर्जित करणे या मुद्द्यांवर प्रत्यक्ष संसदेप्रमाणे कामकाज चालवले गेले.

राष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या या यशामुळे शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्तेची आणि सुसंस्कृत नेतृत्वाच्या जडणघडणीची पुनर्प्रचिती आली असल्याचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी सांगितले. प्र-कुलगुरू ज्योती जाधव व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी संघाचे व समन्वयकांचे कौतुक केले स्पर्धा यशस्वी होण्यासाठी डॉ. कविता वड्राळे, डॉ. सुखदेव उंदरे, आकाश ब्राह्मणे, विद्यार्थी विकास विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.




**कोल्हापूर : १७व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेच्या विजेतेपदाची ट्रॉफी केंद्रीय संसदीय कार्य मंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्या हस्ते स्वीकारताना शिवाजी**

17 JUL 2026

पुण्यनगरी

# विद्यापीठाला 'युवा संसद'मध्ये तिसऱ्यांदा विजेतपद

**कोल्हापूर :** भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित १७ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सलग तिसऱ्यांदा गटस्तर विजेतपदाची ट्रॉफी पटकावली आहे. यापूर्वी १४ व्या आणि १६ व्या स्पर्धेमध्ये विद्यापीठानें गटस्तरीय विजेतपद प्राप्त केले होते. राजधानी नवी दिल्ली येथे संसद भवन परिसरातील बालयोगी सभागृहात केंद्रीय संसदीय कार्य व कायदामंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या संघाला विजेतपदाचा चषक प्रदान करण्यात आला. तसेच विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांना 'गुणवत्तापूर्ण बेस्ट प्रेझेंटर' पुरस्कार प्रदान करण्यात आला. यामध्ये स्वप्नील माने, संदेश लडकट, नेहा शिंदे, तेजस सन्मुख, श्रेया म्हापसेकर, चंदनकुमार ओझा, श्रुती कुरणे, प्रतिभा बामणे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. शिवाजी विद्यापीठ युवा संसद स्पर्धा समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनाही सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. युवा संसद संघासोबत डॉ. संतोष सुतार उपस्थित होते.

17 JUL 2026

पुढारी

# श्रेया म्हापसेकरला बेस्ट प्रेझेंटर युवा संसद पुरस्कार



**कोल्हापूर :** केंद्र सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयाच्या वतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर संघाने राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्या संघातील श्रेया नंदकुमार म्हापसेकर हिने अर्थमंत्रीची भूमिका साकारत आपल्या उत्कृष्ट संसदीय कौशल्याची छाप पाडली. तिला केंद्रीय कायदा व न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या हस्ते गुणवत्तापूर्ण बेस्ट प्रेझेंटर युवा संसद पुरस्कार प्रदान करण्यात आला. दिल्ली येथील बालयोगी सभागृह, संसद भवन येथे हा पुरस्कार देण्यात आला. सलग दुसऱ्यांदा श्रेयाला या पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. प्रल्हाद माने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 JUL 2026

जनप्रवास

# इन्फ्राप्लान समूहासमवेत विद्यापीठाचा करार

## संशोधन, कौशल्य विकास व उद्योग-शैक्षणिक सहकार्य वृद्धिंगत करण्याचा करारातून उद्देश



शिवाजी विद्यापीठाचा इन्फ्राप्लान समूहासमवेत झालेल्या सामंजस्य कराराच्या प्रतींचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत हस्तांतरण करताना कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि आशिष दोशी. सोबत उपस्थित अधिकारी व मान्यवर.

**जनप्रवास : कोल्हापूर**

जलसंपदाविषयक पायाभूत अभियांत्रिकी सुविधा क्षेत्रात अग्रेसर असलेल्या इन्फ्राप्लान समूहासमवेत शिवाजी विद्यापीठाने नुकताच सामंजस्य करार केला. संशोधन, कौशल्य विकास व उद्योग-शैक्षणिक सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देश करारामागे असून आधुनिक संशोधनाच्या दृष्टीने दोन्ही संस्थांमध्ये ज्ञान, तंत्रज्ञान व अनुभवांचे आदानप्रदान होऊन विद्यार्थी, संशोधक आणि उद्योग क्षेत्रासाठी नव्या संधी उपलब्ध होतील.

इन्फ्राप्लान समूह गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ जलसंपदा व पायाभूत सुविधा क्षेत्रात विशेष अभियांत्रिकी सेवा प्रदान करत आहे. समूहामध्ये इन्फ्राप्लान इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा. लि., सिग्मा इन्फ्राप्लान इंजिनिअरिंग प्रा. लि. तसेच इन्फ्राप्लान हायड्रॉलिक लॅबोरेटरी यांचा समावेश आहे. विद्यापीठातील भूगोल अधिविभाग आणि हवामान बदल व शाश्वतता अभ्यास केंद्रामध्ये जलविद्याविषयक संशोधन सुरू असून या संशोधनाला उद्योग क्षेत्राची जोड मिळण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वाचा ठरणार आहे.

या सामंजस्य कराराअंतर्गत विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, औद्योगिक प्रशिक्षण, लाईव्ह इंडस्ट्री प्रोजेक्ट्स, संयुक्त संशोधन, कौशल्य विकास, नवोपक्रम, स्टार्टअप्स, पेटंट विकास तसेच विविध सरकारी संशोधन प्रकल्पांमध्ये सहकार्याची संधी मिळणार आहे. उद्योगाभिमुख शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाला चालना देणारा हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार असल्याचे यावेळी भूगोल अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी सांगितले.


सामंजस्य करारावर कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि इन्फ्राप्लान समूहाचे संचालक आशिष अभय दोशी यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. गणेश न्हिवेकर आणि डॉ. सोमनाथ पवार उपस्थित होते.

1 7 JUL 2026

तरुण भारत

# उपकुलसचिव निवास माने यांना पीएच. डी.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. निवास माने यांना शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. पदवी जाहीर झाली आहे. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत व्यवस्थापन शास्त्र विषयांतर्गत 'उच्च शिक्षण




संस्थांमधील संगणकीकरण आणि ईआरपी प्रणालींची प्रभावी अंमलबजावणी' विषयावर डॉ. चिंतामणी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला. निवास माने यांनी शिवाजी विद्यापीठाच्या संगणकीकरण प्रक्रियेत उल्लेखनीय योगदान दिले आहे. प्रशासन व परीक्षा विभागातील अनेक संगणक प्रणालींच्या विकासामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून, ओपीडीसी, शिव दीक्षांत व एसआरपीडीसारख्या प्रणालींच्या निर्मिती व अंमलबजावणीत त्यांनी योगदान दिले आहे. या प्रणालींमुळे विद्यापीठातील वेळ, श्रम व निधीची बचत झाली आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. मारुलकर, परीक्षा संचालक डॉ. अजित जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

17 JUL 2026
लोकमत

# उपकुलसचिव निवास माने यांना पीएच.डी.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे



उपकुलसचिव डॉ. निवास यशोदा संभाजी माने यांना 'उच्च शिक्षण संस्थांमधील संगणकीकरण आणि ईआरपी प्रणालींची प्रभावी अंमलबजावणी' या महत्त्वपूर्ण संशोधन विषयासाठी शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. पदवी जाहीर झाली आहे. व्यवस्थापनशास्त्र विषयात त्यांनी हा संशोधन प्रबंध सादर केला असून, त्यांना डॉ. चिंतामणी काळे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांना कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. केदार मारूलकर, डॉ. अजित जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

17 JUL 2026

पुढारी

# कायदा व्यवसायात कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव : डॉ. पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

एआयचा प्रभावी वापर करणारे वकील भविष्यात अधिक सक्षम ठरतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ 'सीडीओई'चे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले.

शहाजी लॉ कॉलेजमध्ये 'कायदा व्यवसायातील कृत्रिम बुद्धिमत्ता : संधी, आव्हाने आणि भविष्य' या विषयावर आयोजित ते बोलत होते.

यावेळी डॉ. विश्वनाथ मगदूम यांनी बदलत्या काळात एआयचा जबाबदारीने वापर करण्याचे महत्त्व सांगितले. कार्यशाळा समन्वयक डॉ. सुचिता सुरगिळोळी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. एम. सी. शेख यांनी महाविद्यालयाचा परिचय करून दिला. डॉ. अस्मिता पाटील, प्रा. सादिया मुल्ला यांनी सूत्रसंचालन केले.

17 JUL 2026

जनप्रवास

# विद्यापीठाच्या दोन परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल - उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ एप्रिल पासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. गुरुवारी विविध ७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ५ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या असून या परीक्षांसाठी १६७ विद्यार्थी उपस्थित होते. गुरुवारी २ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केलेले असून आजअखेर ८४६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केलेले आहेत. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत.

17 JUL 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ८४६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** विद्यापीठाच्या मार्च-एप्रिलमधील ८४६ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले. कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी बॅचलर ऑफ एज्युकेशन, बी. कॉम., मास्टर ऑफ एज्युकेशन अशा विविध ७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा पाच केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या. दि. १६ रोजी बी. फार्म अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

17 JUL 2026
तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तरचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील गुरूवार दि. १६ रोजी २ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. आजअखेर ८४६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. गुरूवारी विविध ७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ५ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असुन परीक्षेसाठी १६७ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून मंगळवारी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद करण्यात आली नाही. परीक्षेत शिस्त राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.